# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मनपा ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ अन्वये उपद्रव शोध **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** पथकाकरीता निवृत्त लष्करी कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आली असुन त्यांचे पदनाम, कार्यरत संख्या व देय मानधन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यरत संख्या | प्रतिमाह प्रति व्यक्ती देय मानधन (सध्या स्थितीत) |
|---|---|---|---|
| १ | Squad Leader | १ | ४०,०००/- |
| २ | Zonal Squad Leader | ९ | ३०,०००/- |
| ३ | Security Assistant | १३४ | २४,०००/- |
| Total | | १४४ | |

या सोबत वरील प्रमाणे कार्यरत प्रत्येक कर्मचाऱ्यांना वाहन भत्ता १५००/- व दुरध्वनी भत्ता ५००/- असे एकुण २०००/- प्रतिमहा प्रति कर्मचाऱ्यांना देण्यात येत होते. उपद्रव शोध पथकावर त्यांना नेमुण देण्यात आलेल्या उपद्रवाव्यतीरिक्त इतर विभागातील कामे जसे अतिक्रमण विभाग, जलप्रदाय विभाग, कोव्हीड संदर्भातील कामे तसेच उद्यान विभागाशी संबंधीत उपद्रवे व सहाय्यक आयुक्त यांनी सुचविलेले इतर कामे उपद्रव पथकामार्फत करण्यात येत असल्यामुळे उपद्रव पथक प्रमुख यांनी पेट्रोल भत्ता व मोबाईल भत्ता वाढुन देण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार उपद्रव शोध पथकातील प्रत्येक कर्मचाऱ्यांना पेट्रोल भत्ता रु. ३०००/- प्रतिमाह व मोबाईल भत्ता रु. १०००/- प्रतिमाह असे एकुण रु. ४०००/- प्रतिमाह भत्ता उपद्रव शोध पथकातील कर्मचाऱ्यांना यापुढे लागु करण्याकरीता मा. आयुक्त महोदय यांनी दि. ०४/०५/२०२३ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मा. प्रशासक यांचे मान्यतेस सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 386/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 25/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा ठराव क्र. ५३ दि. २०/०६/२०१७ अन्वये उपद्रव शोध पथकाकरीता निवृत्त लष्करी कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आली असुन त्यांचे पदनाम, कार्यरत संख्या व देय मानधन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | कार्यरत संख्या | प्रतिमाह प्रति व्यक्ती देय मानधन (सध्या स्थितीत) |
|---|---|---|---|
| १ | Squad Leader | १ | ४०,०००/- |
| २ | Zonal Squad Leader | ९ | ३०,०००/- |
| ३ | Security Assistant | १३४ | २४,०००/- |
| Total | | १४४ | |

या सोबत वरील प्रमाणे कार्यरत प्रत्येक कर्मचाऱ्यांना वाहन भत्ता १५००/- व दुरध्वनी भत्ता ५००/- असे एकुण २०००/- प्रतिमहा प्रति कर्मचाऱ्यांना देण्यात येत होते. उपद्रव शोध पथकावर त्यांना नेमुण देण्यात आलेल्या उपद्रवाव्यतीरिक्त इतर विभागातील कामे जसे अतिक्रमण विभाग, जलप्रदाय विभाग, कोव्हीड संदर्भातील कामे तसेच उद्यान विभागाशी संबंधीत उपद्रवे व सहाय्यक आयुक्त यांनी सुचविलेले इतर कामे उपद्रव पथकामार्फत करण्यात येत असल्यामुळे उपद्रव पथक प्रमुख यांनी पेट्रोल भत्ता व मोबाईल भत्ता वाढुन देण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार उपद्रव शोध पथकातील प्रत्येक कर्मचाऱ्यांना पेट्रोल भत्ता रु. ३०००/- प्रतिमाह व मोबाईल भत्ता रु. १०००/- प्रतिमाह असे एकुण रु. ४०००/- प्रतिमाह भत्ता उपद्रव शोध पथकातील कर्मचाऱ्यांना यापुढे लागु करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**